EAU/ICD/2021-22/417
18th February, 2022

# मुंबई विद्यापीठ

क्र.१०/२०२१-२२

मसुदा गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२२ मधील २४ जानेवारी, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची दहावी सभा सोमवार **दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा आभासी पध्दतीने घेण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ६. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ७. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ८. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ९. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १०. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| ११. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १२. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १३. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

- **स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

- **अनुपस्थिती :-** प्राचार्य (डॉ.) अजय भामरे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. आर. एन. सिंह**

भाजपचे विधान परिषदेतील आमदार आणि मुंबई उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष श्री. आर. एन. सिंह यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०२ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते.

**श्रीमती. सिंधुताई सपकाळ**

अनाथ मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले आयुष्य वेचणा-या आणि अनाथांची माय या नावानेच ओळखल्या जाणा-या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती. सिंधुताई सपकाळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०४ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७४ वर्षांच्या होत्या.

**श्रीमती. राजश्री आपटे**

चित्रकार श्रीमती. राजश्री आपटे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०५ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५८ वर्षांच्या होत्या.

**न्यायमूर्ती. आर. डी. तुळपळे**

मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. आर. डी. तुळपळे यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०७ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते १०० वर्षांचे होते.

**श्री. बाळ ठाकूर**

रेषानी चित्राला बोलके करणारे आणि रेषेपलीकडील चित्रकार अशी ओळख असलेले श्री. बाळ ठाकूर यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०८ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**श्री. सुधीर श्रीकृष्ण दामले**

नाटयदपर्ण या नाटयविषयक मासिकाचे संपादक व 'नाटयदर्पण रंजनी' चे जनक श्री. सुधीर कृष्ण दामले यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०८ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**श्री. रामदास कामत**

ज्येष्ठ रंगकर्मी, गायक श्री रामदास कामत यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०८ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. बाळासाहेब प्रधान**

ज्येष्ठ शास्त्रीय संगीत गायक श्री. बाळासाहेब प्रधान यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

**प्रा. कृ. ना. वळसंगकर**

रूईया महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. कृ. ना. वळसंगकर यांचे वृध्दपकाळाने दिनांक १० जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**प्रा. सुभाष देव**

रत्नागिरीतील गोगटे-जोगळेकर महविद्यालयातील माजी प्राचार्य सुभाष देव यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते.

**पंडीत. भालचंद्र देव**

ज्येष्ठ व्हायोलिन वादक पं. भालचंद्र देव यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**श्रीमती. रेखा कामत**

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. रेखा कामत यांचे वृध्दपकाळाने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८९ वर्षांच्या होत्या.

**श्री. सुनील मेहता**

मराठी साहित्य प्रसिध्द प्रकाशक श्री सुनील मेहता यांचे अल्पशा आजाराने दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५६ वर्षांचे होते.

**श्रीमती सुमन मुरलीधर भामरे**

प्राचार्य (डॉ.) अजय भामरे वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता, यांच्या मातोश्री श्रीमती सुमन मुरलीधर भामरे यांचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या.

**न्यायाधीश एस. के. शहा**

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री एस.के. शहा यांचे दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी निधन झाले.

**श्री. मोहन सकपाळ**

सामाजिक कार्यकर्ते, चित्रकार श्री. मोहन सकपाळ यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते.

**श्री. कुमार नवाथे**

साहित्यिक, पत्रकार, कलाकार आणि लेखक श्री. कुमार नवाथे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १३ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षाचे होते.

**श्री. काशीराम चिंचय**

कोळीगीतांना सातासमुद्रपार पोहोचवणारे गीतकार, शाहीर श्री काशीराम चिंचय यांचे अल्पशा आजाराने दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते.

**श्री. अरूण जाखडे**

सर्जनशील लेखक, साक्षेपी संपादक आणि दूरदृष्टी असलेले प्रकाशक तसेच मराठी प्रकाशक परिषदेचे अध्यक्ष श्री. अरूण जाखडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते.

**कवी इब्राहिम अश्क**

प्रख्यात गीतकार, लेखक आणि कवी इब्राहिम अश्क यांचे अल्पशा आजाराने दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते.

**प्रा. डॉ. एन. डी. पाटील**

महाराष्ट्रातील प्रबोधन, पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीचे अग्रणी ज्येष्ठ नेते, माजी सहकार मंत्री प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे दिर्घ आजाराने दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**पं. बिरजू महाराज**

प्रसिध्द कथ्थक सम्राट, पद्मविभूषण पंडीत बिरजू महाराज यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**ॲड. श्रीकांत शिवदे**

ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. श्रीकांत शिवदे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षांचे होते.

| अनुक्रमांक | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. ३० डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि.३० डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तींसह मंजुर करण्यात आले.<br>इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने डॉ. वैभव नरवडे यांनी, बी.एन.एन महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या तक्रारीबाबत व मुंबई विद्यपीठाच्या ग्रंथपाल पदाच्या नियुक्तीबाबत दि. ३० डिसेंबर, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत उपस्थित केलेला मुद्दा इतिवृत्तामध्ये नसल्याबाबत सांगितले. सदर बाबत मा. अध्यक्षांनी कुलसचिवांना निर्देश दिले की, डॉ. वैभव नरवडे यांनी उपस्थित केलेले मुद्दे लेखी स्वरूपात प्राप्त झाल्यावर सदरबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.<br>तसेच श्री. रविकांत सांगुर्डे यांनी, भाऊसाहेब नेने महाविद्यालयासंदर्भात उपस्थित केलेला मुद्दा इतिवृत्तात आलेला नसल्याबाबत सांगितले असता सदरहु महाविद्यालयाचे शिक्षक श्री. शिकारे यांचा विषय संपुष्टात | |

| | | |
|---|---|---|
| | आल्याचे, तसेच परवानगी संदर्भात न्यायालयात सुनावणी सुरू आहे असे कुलसचिवांनी सांगितले. त्यानुसार श्री. रविकांत सांगुर्डे यांनी दिलेल्या लेखी पत्रांना उत्तर द्यावे, तसेच महाविद्यालयाच्या इतर सर्व तक्रारीबाबत मा. प्र-कुलगुरू आणि मा. कुलसचिव यांनी व्यक्तीश: लक्ष घालावे असे निर्देश मा. कुलगुरुंनी कुलसचिवांना दिले. | |
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दिनांक ७ फेब्रुवारी, २०२० चा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त संस्थांचे प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची बाब. | संलग्नता व मान्यता विभाग |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त संस्थांचे प्रस्ताव अनुपालन अहवालासह दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत ठेवण्यात आला असता १० पैकी ९ प्रस्ताव शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील परिशिष्ट 'क' ची पुर्तता करीत असल्याने पात्र करून अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची बाब मान्य करण्यात आली. (परिशिष्ट 'अ') तसेच ०१ महाविद्यालय (नियाज अहमद मायनॉरीटीज ट्रस्टचे नियाज नॅशनल डिग्री कॉलेज, गोवंडी, मुंबई -४०००४३) परिशिष्ट 'क' ची पुर्तता करीत नसल्याने अपात्र ठरविण्यात आले. | |
| बाब क्र. ४ | दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी बाब क्र. ९.१ (८७) अन्वये मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित/विनाअनुदानित विभाग/केंद्र/ संस्था येथील प्राध्यापक पदांची निवड करणाऱ्या निवड समितीमध्ये शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१९ मधील कलम ६(१) (III) (a) (v) अन्वये विद्या परिषदेने सहा तज्ञ (जे विद्यापीठाशी संबंधित नाहीत) यांचे नामनिर्देशन करण्याबाबतचा ठराव मंजुरीसाठी सादर. | (AAQA) |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित/विनाअनुदानित विभाग/केंद्र/ संस्था येथील प्राध्यापक पदांची निवड करणाऱ्या निवड समितीमध्ये शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१९ मधील कलम ६(१) (III) (a) (अ) अन्वये विद्या परिषदेने सहा तज्ञ (जे विद्यापीठाशी संबंधित नाहीत) यांचे नामनिर्देशन करण्याबाबतचे अधिकार व्यवस्थापन परिषदेने मा. कुलगुरुना प्रदान केले. तसेच मा. कुलसचिवांना निर्देश दिले की, वेळोवेळी नामनिर्देशित केलेल्या तज्ञांची नावे व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर करावीत. डॉ. वैभव नरवडे यांनी सदर ठरावास आक्षेप नोंदविला व कायदयातील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेने सदर तज्ञांची नावे द्यावीत, असे मत नोंदविले. | |
| बाब क्र. ५ | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय क्र. बैठक-२०२०/प्रक्र.५३/२०/विशि-१ दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ अन्वये दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत. | (CTAU) |
| ठराव | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत निर्गमित केलेला शासन निर्णय क्र. बैठक-२०२०/प्रक्र.५३/२०/विशि-१ दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ स्विकारण्यात आला. | |
| बाब क्र. ६ | To rent out the flat of University of Mumbai at Parsee Colony, Dadar. | FKA ENGG GAD Kalina |
| ठराव | चर्चेच्या सुरूवातीला मा. कुलसचिवांनी सभागृहास अवगत केले की, सेंट्रल बँकेच्या मॅनेजर सोबत झालेल्या चर्चेनुसार सदरहु मालमत्तेला (फ्लॅट) "सौदामिनीबाई अलाईस कमलबाई महादेवराव पंतवैद्य क्वार्टर" असे नाव देण्यात यावे. सदर फ्लॅट विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना भाडेतत्वावर देण्यात यावा. त्यातुन येणाऱ्या उत्पनातून इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किंवा पारितोषिक देण्यात यावी व ती पारितोषिके | |

श्री. महादेवराव वसंत पंतवैद्य आणि सौ. सौदामिनीबाई अलाईस कमलबाई महादेवराव पंतवैद्य यांच्या नावाने देण्यात यावीत.

सदरहु मालमत्तेशिवाय अजून काही वस्तु (उदा. दागिने, शेअर सर्टीफिकेट) सेंट्रल बॅकेकडून आपल्या ताब्यात घेणे आवश्यक आहे, त्यासाठी काही तरतूदी कराव्यात तोपर्यंत त्यांचा ताबा मिळणार नाही अशी बॅकेने अट घातलेली आहे.

सदरहु फ्लॅट भाडेतत्वावर देण्याअगोदर महामहीम राज्यपाल महोदय यांना कळविणेबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी सदर बाब मा. कुलसचिवांनी व्यवस्थापन परिषदेसमोर मांडली.

ॲड. निल हेळेकर यांनी असे मत व्यक्त केले की, सदर फ्लॅट भाडेतत्वावर जरी दिला तरी त्याच्या देखभालसंबंधीचा, डागडुगीचा इतर सर्व खर्च विद्यापीठास करावा लागेल, तसेच सदर फ्लॅट हा दादर या ठिकाणी एका बाजूला असल्याने फोर्ट अथवा विद्यानगरी परिसरापासून दूर आहे व विद्यापीठाचा कुठलाही विभाग अथवा संस्था जवळपास नाही, अतिथीगृहाचा विचार केल्यास ते ही व्यवहारिकदृष्टया शक्य नाही. यास्तव, याबाबत कायदेशीर मत घ्यावे व सदर फ्लॅटची विक्री करुन येणा-या रक्कमेचा वापर (corpus fund) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किंवा पारितोषिक देण्यासाठी करावा. या पर्यायासाठी कोणाची हरकत असणार नाही, कारण मृत्यूपत्रात नमूद आहे की, यामधून जो पैसा येणार आहे त्यातून शिष्यवृत्ती देण्यात यावी.

श्री. प्रदीप सावंत यांनी सुचविले की, विद्यापीठात प्रवेश घेणा-या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृहात रुपांतर केल्यास योग्य होईल अथवा इतर विद्यापीठातून, बाहेरुन येणा-या शिक्षकांना, पदाधिका-यांना राहण्यासाठी अतिथीगृह म्हणून त्याचा उपयोग व्हावा असे सुचित केले. सदर फ्लॅटची विक्री करू नये असे मत त्यांनी मांडले.

मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास सांगितले की, श्री. महादेवराव पंतवैद्य यांच्या अधिकृत मृत्यूपत्रानुसार सदर फ्लॅट भाडेतत्वावर एखादया प्राध्यापकास देणे व त्यांच्या घर भाडयामधून जी रक्कम मिळेल तीची

| | | |
|---|---|---|
| | पुर्नगुंतवणूक करून त्यातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अथवा पारितोषिक देणे अपेक्षित आहे. सदर फ्लॅट २०२१ मध्ये विद्यापीठाने ताब्यात घेतला आहे. मात्र सेंट्रल बॅकेच्या ताब्यात असलेल्या अजून काही वस्तू (उदा. दागिने, शेअर सर्टीफिकेट) आपल्याकडे येणे आवश्यक आहेत. मात्र त्यासाठी सेंट्रल बॅकेने अट घातली आहे, की प्रथम या बाबींची पूर्तता विद्यापीठाने करावी.<br>सदर विषयाच्या सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, सेंट्रल बॅकेने घातलेल्या अटीमुळे श्री. महादेवराव पंतवैद्य यांच्या अधिकृत मृत्यूपत्रानुसार सदर फ्लॅट भाडेतत्वावर एखादया प्राध्यापकास देणे व त्यांच्या घर भाडयामधून जी रक्कम मिळेल तीची पुर्नगुंतवणूक करून त्यातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अथवा पारितोषिक देणे व सेंट्रल बॅकेच्या ताब्यात असलेल्या सर्व वस्तू लवकरात लवकर आपल्या ताब्यात घेणे. सर्व वस्तूंचा ताबा मिळाल्यानंतर सदर बाब पुन:श्च व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करून त्यावर व्यवस्थापन परिषद निर्णय घेईल. | |
| बाब क्र. ७ | विद्या परिषद दिनांक १०/११/२०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्र.६.१ Proposal for adoption the Gazette of Regulation for Minimum Standards of Architectural Education of the Council of Architecture 2020 in the University of Mumbai from the academic year 2021-22 अन्वये पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | (AAMS) |
| ठराव | विद्या परिषद दिनांक १०/११/२०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्र.६.१ Proposal for adoption the Gazette of Regulation for Minimum Standards of Architectural Education of the Council of Architecture 2020 in the University of Mumbai from the academic year 2021-22 अन्वये पारित केलेल्या ठरावांस मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ८ | विद्या परिषद दिनांक २८/१२/२०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्र. ५.१ (A)- amendment of O.6429 relating to the eligibility for B.Voc. (Interior Design), 6.18 - Correction in the Title of M.Sc. (Material Science) instead of M.Sc. (Material Science) in Physics and 7.1(A)- amended O.6631 for Title as B.Voc.(Retail) instead of B.Voc. (Retail Management) अन्वये पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | (AAMS) |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्या परिषद दिनांक २८/१२/२०२१ रोजीच्या आभासी सभेमध्ये अनुक्रमे बाब क्र. ५.१ (A)- amendment of O.6429 relating to the eligibility for B.Voc. (Interior Design), 6.18 - Correction in the Title of M.Sc. (Material Science) instead of M.Sc. (Material Science) in Physics and 7.1(A)- amended O.6631 for Title as B.Voc.(Retail) instead of B.Voc. (Retail Management) अन्वये पारित केलेल्या ठरावांस मान्यता देण्यात आली. | |
| | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेला विषय | |
| बाब क्र. ९ | मुंबई विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या हंगामी शिक्षकेतर कर्मचा-यांच्या एकत्रित वेतनात वाढ करणेबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या हंगामी शिक्षकेतर कर्मचा-यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्याचा मुद्दा व्यवस्थापन परिषदेसमोर मा. अध्यक्षांनी चर्चेसाठी घेतला व सदर बाबीसाठी गठीत समितीचे अध्यक्ष ॲड. निल हेळेकर यांना त्यांच्या समितीच्या अभ्यासाचे सादरीकरण करण्यास सांगितले. त्यानुसार ॲड. निल हेळेकर यांनी सविस्तर सादरीकरण केले. हंगामी शिक्षकेतर कर्मचा-यांना आपण किती वाढ एकत्रित वेतनात देऊ शकतो, तसेच विद्यापीठावर याचा किती आर्थिक भार येणार आहे, तसेच याबाबत तरतूद सध्या आहे का, या सर्व बाबींचा सारासार विचार करणे गरजेचे आहे. सध्या विद्यापीठात साधारणतः एकुण १२०० हंगामी कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी ब-याच जणांचा न्यायालयात दावा चालू आहे, तर काही जणांचा न्यायालयात दावा चालू नाही. यापैकी बरेचजण नियमित कामावर येतात. काहीजण रोजंदारीवर आहेत. तसेच त्यांच्या एकुण एकत्रित पगारामध्ये बरीच तफावत आहे. काहीजण १० हजाराच्या खाली एकत्रित पगार घेणारे आहेत तर काही ५० हजाराच्या एकत्रित पगार घेणारे आहेत. ज्यांना अधिक मदत करणे आवश्यक आहे त्यांना रू.११,००० ते रू.१५,०००/- इतका एकत्रित पगार व ज्यांचा एकत्रित पगार त्यापेक्षा अधिक आहे त्यांना मोठी पगार वाढ न देता त्यांना कमी पगार वाढ करु | |

शकतो. या सगळया गोष्टींचा सारासार विचार करुन तसेच माणुसकीच्या नात्याने तुर्तास समिती असे सुचवित आहे की, जे रू.१०,०००/- पेक्षा कमी म्हणजे रू.८,०००/- ते रू.९,०००/-च्या श्रेणीत आहेत, त्यांना अधिकाअधिक म्हणजे २५ ते ३० टक्के किंवा रू.११,००० ते रू. १५,०००/- पर्यंत एकत्रित वेतन देण्यात यावे. ज्यांचा एकत्रित पगार अधिक आहे त्यांना ५ टक्के वेतनवाढ देण्यात यावी. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, हयामधले बरेचसे कर्मचारी कामावर येत नाहीत, त्यांची हजेरी कुठेही घेतली जात नाही तरी त्यांना पगार दिला जात आहे. या सर्व गोष्टींना आळा बसण्याकरीता Biometric प्रणाली नुसार हंगामी व रोजंदारीवरील सर्व कर्मचा-यांची उपस्थिती नोंदविण्यात यावी. सदर प्रणाली विद्यापीठाच्या सर्व प्रागणांमध्ये कार्यरत करावी परस्परांशी जोडावी जेणे करून कोणीही कुठुनही स्वत:ची हजेरी नोंदवू शकेल.

श्री. प्रदिप सावंत यांनी हंगामी व रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना तात्काळ Biometric प्रणाली नुसार उपस्थिती नोंदवणे सुरू करावे व ती हजेरी पगाराशी जोडावी असे मत मांडले. श्री. रविकांत सांगुर्डे यांनीही त्यांच्या मतास सहमती दर्शविली. प्राचार्य महादप्पा गोंडा यांनी असे सुचविले की, जी पगार वाढ करण्यात येणार आहे ती पुर्वलक्षी देण्यात येणार आहे की ज्या दिवशी ठराव होणार त्या दिवसापासून हा मुद्दा स्पष्ट करावा.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की, सदर समितीने आपला अंतिम अहवाल लवकरात लवकर सादर करावा जेणेकरून तो पुढील व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून त्यावर निर्णय घेण्यात येऊन त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करता येईल. त्याच बरोबर समितीने वेतनवाढ करताना विद्यापीठावर किती आर्थिक भार येईल, दर महिन्याला किती तरतूद करावी लागेल, त्याबाबत सदर समितीने मा.कुलगुरू, प्र-कुलगुरू, इत्यादींची बैठक घेऊन माहिती दयावी.

| | | |
|---|---|---|
| ठराव | सभेच्या अखेरीस श्री. रविकांत सांगुर्डे यांनी विद्यापीठात हिंदू तत्वज्ञान अभ्यासकेंद्र सुरू केल्याबद्दल व्यवस्थापन परिषदेचे आभार मानले व लवकरच या केंद्रामार्फत आंतरराष्ट्रीय परिषद आयोजीत करण्यात येत आहे असे सांगितले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू